# मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन(स्मार्ट) प्रकल्प, पुणे प्रकल्पांतर्गत रिक्त संवर्ग पदे सेवा निवृत्त अधिका-यांमधुन भरण्याकरिता नामिकासूची तयार करण्यासाठी वैयक्तिक माहितीसह अर्ज मागविण्यात येत आहेत.

जागतिक बँक अर्थ सहाय्यित मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पांतर्गत विभागीय प्रकल्प अंमलबजावणी कक्ष स्तरावरील सहाय्यक अभियंता संवर्गातील ८ पदे आवश्यकतेनुसार शासकीय सेवेतून निवृत्त सहाय्यक अभियंता/कनिष्ठ अभियंता यांचेमधून भरणेकरिता नामिकासूची तयार करणेसाठी सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि.१७/१२/२०१६ मधील तरतुदीनुसार आवश्यक शैक्षणिक अर्हता व अनुभव धारण करणाऱ्या पात्र सेवानिवृत्त अभियंताकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. छाननीअंती पात्र ठरलेल्या अभियंत्यांची नामिकासूची तयार करण्यात येईल आणि या नामिकासूचीतील अभियंत्यांची आवश्यकतेनुसार मुलाखतीद्वारे रिक्त पदावर नियुक्ती करण्यात येईल.

पदासाठींची शैक्षणिक अर्हता, अनुभव, कामाचे स्वरूप, अर्जाचा विहित नमुना व अर्ज करण्याची पध्दती इ. बाबतची सविस्तर माहिती प्रकल्पाच्या https://www.smart-mh.org या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

इच्छुक शासकीय सेवेतून निवृत्त अभियंत्यानी शैक्षणिक अर्हता, अनुभव इत्यादीबाबतच्या स्वस्वाक्षरीत प्रमाणपत्रांसह विहित नमुन्यातील आपला अर्ज दि.३०/१२/२०२२ रोजी सायंकाळी ५.३० वाजेपर्यत किंवा त्यापूर्वी खालील पत्त्यावर सादर करावेत. उमेदवारांनी Hard Copy मध्ये सादर केलेले अर्जच विचारात घेतले जातील. ई-मेल किंवा तत्सम व्दारे सादर केलेले Soft Copy मधील अर्ज ग्राह्य धरले जाणार नाहीत.

**अर्ज सादर करण्याचा पत्ता**

**प्रकल्प संचालक,**

मा.बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प,
प्रकल्प समन्वय व व्यवस्थापन कक्ष,
शेती महामंडळ भवन,
२७०,भांबुर्डा, सेनापती बापट रोड,
पुणे ४११०१६.

स्वाक्षरीत/-
**(कौस्तुभ दिवेगावकर)**
प्रकल्प संचालक,
मा.बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व
ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प